05 AUG 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाने पुसले करंजफेण पूरग्रस्तांचे अश्रू

## सातशे कुटुंबांना धान्य, इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप



कोल्हापूर : विद्यापीठाच्या वतीने करंजफेण परिसरातील पूरग्रस्त नागरिकांना साहित्य वाटप करण्यात आले.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून शाहूवाडी तालुक्यातील करंजफेण, पाल, सावर्डी आदी गावांतील पूरग्रस्तांचे अश्रू पुसण्याचे काम केले. परिसरातील सातशे कुटुंबांना धान्य व इतर जीवनावश्यक वस्तू तसेच स्वच्छता कीटचे वाटप करण्यात आले.

विद्यापीठाकडे पुणे येथील नॉर ब्रॅमसे, ग्लोबल केअर यांच्या सीएसआर फंडातून तसेच वर्क फॉर इक्वॅलिटी या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. शिवाजी विद्यापीठ आपत्ती व्यवस्थापन कक्ष व यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटच्या समाजकार्य अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी मदत वाटण्यासाठी पुढाकार घेतला.

आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे समन्वयक डॉ. एम. एम. गायकवाड व समाजकार्य अधिविभागातील सहायक संचालक अमोल मिणचेकर यांच्या मार्गदर्शनाखाली २० विद्यार्थ्यांच्या सहाय्याने ही मदत गरजूंपर्यंत पोहोचविण्यात आली. करंजफेण परिसराला पुराचा तडाखा बसला आहे. मात्र, हा परिसर दुर्गम असल्याने सुरुवातीला त्याची तीव्रता लक्षात आली नव्हती.

करंजफेण, पाल व सावर्डी गावांतील ७० टक्क्यांहून अधिक घरे पाण्यात होती. १२ घरे अतिवृष्टीने जमीनदोस्त झाली आहेत. शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. विद्यापीठाने पुढाकार घेऊन दुर्गम भागातील पूरग्रस्त नागरिकांपर्यंत मदत पोहोचवली. यासाठी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

### विद्यार्थ्यांचे ऋणानुबंध अन् गहिवरलेले ग्रामस्थ

शिवाजी विद्यापीठाच्या समाजकार्य अधिविभागातील विद्यार्थी आणि शिक्षक करंजफेण परिसरात दोन वर्षांपूर्वी ग्रामीण विकासाचा आढावा घेण्यासाठी आठवडाभर मुक्कामी होते. या काळात विद्यार्थ्यांचे संबंधित गावकऱ्यांशी ऋणानुबंध जुळले होते. ग्रामस्थांवर दुःखाचा डोंगर कोसळला असताना हेच विद्यार्थी मदत साहित्य घेऊन गावात आल्याने ग्रामस्थांचे डोळे भरून आल्याचे चित्र होते.

0 5 AUG 2021
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### उच्च-तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांची घोषणा

# सीईटीशिवाय आजपासून महाविद्यालयीन प्रवेश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सरकारकडून पदवी प्रवेशासाठी सीईटी परीक्षा घेतली जाण्याची चर्चा सुरू होती. मात्र, अशी कोणतीही सामाईक प्रवेश परीक्षा घेतली जाणार नाही. बारावीच्या निकालाच्या आधारावरच सीईटीशिवाय महाविद्यालयीन प्रवेश होणार आहेत. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

## आठ दिवसांत महाविद्यालये होणार सुरू

ज्या ठिकाणी कोरोना पॉझिटिव्हिटी रेट कमी आहे, त्या ठिकाणची महाविद्यालये आठ दिवसांत सुरू करण्याच्या सूचना कुलगुरूंना दिल्या आहेत. यासंदर्भात जिल्हाधिकारी स्थानिक परिस्थिती पाहून महाविद्यालये सुरू करण्याचा अंतिम निर्णय घेतील. विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्याच्यादेखील सूचना करण्यात आल्या आहेत, अशी माहिती उदय सामंत यांनी दिली.

राज्य शिक्षण मंडळाने मंगळवारी दुपारी बारावी परीक्षेचा निकाल जाहीर केला. राज्याचा सरासरी निकाल ९९ टक्क्यांपेक्षा अधिक लागला आहे. त्यामुळे आता इतक्या विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रमांना पान ४ वर

## सीईटीशिवाय आजपासून महाविद्यालयीन प्रवेश

**(पान १ वरून)** प्रवेश कसे मिळणार, अशी चर्चा सुरू झाली होती. या पार्श्वभूमीवर सामंत यांनी हा निर्णय जाहीर केला. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. याबाबत सामंत म्हणाले की, बारावी बोर्डाचा जो निकाल लागला आहे, त्याच्या आधारावरच आर्टस्, सायन्स, कॉमर्स या पारंपरिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू होईल. जादा तुकड्यांची आवश्यकता असेल, तर ३१ ऑगस्टपूर्वी आमच्याकडे त्यासंदर्भात प्रस्ताव सादर करावेत. एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही, याची खबरदारी विद्यापीठांनी घ्यायला हवी. कुलगुरूंसोबत झालेल्या बैठकीमध्ये याबाबत सूचनाही देण्यात आलेल्या आहेत, असे सामंत म्हणाले.

**व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सीईटी**

व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी तंत्रशिक्षण विभागांतर्गत प्रवेश परीक्षा (सीईटी) घेण्यात येणार आहे. या परीक्षा २६ ऑगस्टपासून सुरू होतील. यामध्ये प्रामुख्याने एमबीए, एमसीए, आर्किटेक्चर, हॉटेल मॅनेजमेंट या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. बारावीनंतरच्या एमएचटी-सीईटी परीक्षांचे पहिले सत्र ४ सप्टेंबर ते १० सप्टेंबर या कालावधीत सुरू होईल. दुसरे सत्र १४ सप्टेंबर ते २० सप्टेंबर या कालावधीत होईल. कमी विद्यार्थी संख्या असणाऱ्या प्रवेश परीक्षा २६ ऑगस्टपासून सुरू होतील. यामध्ये बीएबीएड, बीएडएमएड, एमपीएमएड, बीपीएड, एमएड, एलएलबी ५ आणि ३ वर्षे या अभ्यासक्रमांची परीक्षा होईल.